# तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

✦ ₹ ५.०० शनिवार दि. ६ ऑक्टोबर २०१८ बेळगाव • गोवा • मुं


डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# रयत कोरेगावात अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारणार

## डी. पी. भोसले कॉलेजच्या विद्यार्थिनींनी सैन्य दलात जाण्यासाठी प्रयत्न करावेत : खासदार शरद पवार यांचे आवाहन

वार्ताहर

एकंबे

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची उभारणी करुन ग्रामीण भागातील गोरगरिबांना शिक्षणाची कवाडे खुली केली. शंभर वर्षामध्ये संस्थेने लाखो विद्यार्थी घडविले आहेत. आज अनेक विद्यापीठांमध्ये कुलगुरु म्हणून संस्थेच्या विद्यार्थ्यांनी काम पाहिले आहे. हिरे घडविणारी ही संस्था असून, कोरेगावातील डी. पी. भोसले कॉलेजला सर्वच बाबतीत पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या कॉलेजचे वैशिष्ट्य म्हणजे येथे शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ६८ टक्के असून, त्यांनी आता सैन्य दलामध्ये करिअर करण्यासाठी प्रयत्न करावा, त्यासाठी लागेल ते सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केले.

येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचा शुभारंभ व मुख्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन खा. पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चेअरमन डॉ. अनिल पाटील होते.



कोरेगाव : कोनशिला अनावरणप्रसंगी खासदार शरद पवार, शेजारी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, आमदार विश्वजित कदम, डॉ. अनिल पाटील, आमदार शशिकांत शिंदे, ॲड. भगिरथ शिंदे, रामशेठ ठाकूर व मान्यवर.

व्यासपीठावर आ. शशिकांत शिंदे, आ. विश्वजित कदम, संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, कार्यकारिणी सदस्य रामशेठ ठाकूर, संजीव पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, पंचायत समितीचे सभापती राजाभाऊ जगदाळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अनिल पाटील म्हणाले, सितेमुळे रामायण, द्रौपदीमुळे महाभारत जसे घडले, तसे कोरेगावच्या मातीत लक्ष्मीबाईंमुळे रयत शिक्षण संस्थेची बिजे रोवली गेली.

आ. शशिकांत शिंदे म्हणाले, कोरेगाव तालुका हा इतिहास घडविणारा तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्याने खासदार शरद पवार यांच्या विचारांनाच स्थान दिले आहे. कोरेगावच्या कॉलेजला सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. भीमराव मदने यांनी आभार मानले. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### आ. शशिकांत शिंदेंच्या निवासस्थानी नारळ पाणी

खा. शरद पवार यांनी व्यस्त दौऱ्यातून आ. शशिकांत शिंदे यांच्या ल्हासुर्णे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. प्रचंड गर्दीत त्यांचे फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. त्यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. कोरेगावच्या नगरसेवकांनी त्यांचे स्वागत केले. डायनिंग टेबलवर फराळ आणि फळांची रेलचेल असली तरी त्यांनी नारळ पाणी घेणे पसंत केले. आ. शिंदे यांच्याबरोबर त्यांनी विविध बिषयांवर चर्चा केली. जयवंतदादा भोसले, भास्कर कदम, अरुण माने, श्रीमंतभाऊ झांजुर्णे, श्रीमंतदादा झांजुर्णे, प्रतापराव कुमुकले–निकम यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी खा. पवार यांचे स्वागत केले.

### पावसाचे सावट अन् खचाखच गर्दी

खा. शरद पवार यांचा कोरेगावातील हा बिगर राजकीय दौरा असला तरी तालुक्यातील राजकीय घडामोडींमुळे या दौऱ्याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले हेते. मात्र तालुक्याचा माहोल लक्षात घेता खा. पवार यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच कोरेगावचा ऋणानुबंध सांगितला. पावसाचे सावट पाहाताच त्यांनी कार्यक्रम आटोपता घेतला.

### क्रीडा संकुलला निधी

रयत शिक्षण संस्थेने शताब्दी वर्षाचे औचित्य साधून कोरेगाव कॉलेजच्या क्रीडा संकुलासाठी दहा लाख रुपये तर रुई हायस्कूलच्या शाळा खोल्या उभारणीसाठी पाच लाख रुपयांचा निधी दिला. खासदार शरद पवार व आमदार शशिकांत शिंदे यांच्या हस्ते रुई हायस्कूलला निधीचा धनादेश प्रदान करण्यात आला. मुंबईतील उद्योजकाने देखील या हायस्कूलसाठी पाच लाख रुपयांचा निधी दिला.